## आजचे पंचांग

दिनांक : ७ ऑगस्ट २०२६ वार : शुक्रवार माह (अमावस्यांत) : आषाढ माह (पूर्णिमांत) : श्रावण ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : नवमी तिथी (दुपारी ०४:३६ पर्यंत) त्यानंतर दशमी तिथी नक्षत्र : कृत्तिका नक्षत्र (सायंकाळी ०६:४२ पर्यंत) त्यानंतर रोहिणी नक्षत्र योग : वृद्धि योग (दुपारी १२:१० पर्यंत) त्यानंतर ध्रुव योग करण : गराजा करण (दुपारी ०४:३६ पर्यंत)



दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...


### महिलेच्या गळ्यातील अडीच लाखांची सोनसाखळी लंपास

**पुणे :** बिबवेवाडी परिसरात पायी जात असलेल्या एका ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील सुमारे अडीच लाख रुपयांची सोनसाखळी दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी हिसकावून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी मार्केट यार्ड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला आहे. याप्रकरणी ज्येष्ठ महिलेने मार्केट यार्ड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार अज्ञात दुचाकीस्वार चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट २०२६ | वर्ष - १ | अंक - ३१० | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### १३ वर्षांनंतर न्यायालयाचा मोठा निर्णय! ' तरुण तेजपाल यांना बलात्कार प्रकरणात १० वर्षांची शिक्षा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई । प्रतिनिधी

२०१३ मधील गाजलेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणात तेहलकाचे माजी संपादक तरुण तेजपाल यांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा धक्का देत १० वर्षांच्या सक्त कारावासाची शिक्षा सुनावली. न्यायमूर्ती नीला गोखले आणि न्यायमूर्ती अमित जामसांडेकर यांच्या खंडपीठाने त्यांच्यावर १० लाखांचा दंडही ठोठावला.

यापूर्वी उच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाने दिलेला निर्दोष मुक्ततेचा निकाल रद्द करून तेजपाल यांना भारतीय दंड संहितेअंतर्गत बलात्कार आणि लैंगिक छळाच्या आरोपांमध्ये दोषी ठरवले होते. त्यानंतर शिक्षेच्या मुद्यावर दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून गुरुवारी अंतिम शिक्षा जाहीर करण्यात आली. राज्य सरकारतर्फे न्यायालयात असा युक्तिवाद करण्यात आला की, पीडितेने स्पष्ट नकार दिल्यानंतरही आरोपीने गुन्हा केला आणि त्याबद्दल कोणताही पश्चात्ताप व्यक्त केला नाही. न्यायालयाने हा मुद्दा गंभीर मानला. त्याचवेळी, घटना १३ वर्षांपूर्वीची असून त्यानंतर आरोपीविरोधात तत्सम गैरवर्तनाची नोंद नसल्याचाही विचार करण्यात आला. न्यायालयाने तेजपाल यांना दोन आठवड्यांच्या आत तुरुंग प्रशासनासमोर शरण जाण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, सुनावण्यात आलेल्या सर्व शिक्षा एकाच वेळी भोगाव्या लागणार असल्याने त्यांना एकूण १० वर्षांचा कारावास भोगावा लागणार आहे. या निकालामुळे देशातील सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणांपैकी एकाला महत्त्वपूर्ण न्यायालयीन पूर्णविराम मिळाला आहे.

### जय महाराष्ट्र' आणि 'दिलखुलास'मधून शेतकरी कर्जमुक्ती योजनेची माहिती; प्रधान सचिव प्रवीण दराडे यांची विशेष मुलाखत

**मुंबई :** राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' या महत्त्वाकांक्षी योजनेविषयी सविस्तर माहिती देण्यासाठी सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे (भा.प्र.से.) यांची विशेष मुलाखत माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' आणि 'दिलखुलास' या कार्यक्रमांतून प्रसारित केली जाणार आहे.

# घर खरेदीदारांना मोठा दिलासा; बिल्डरांचा विलंब

## सबव्हेन्शन योजनेतील गैरव्यवहार असेल तर बँका ईएमआयची सक्ती करू शकत नाहीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी

दिल्ली : घर खरेदीदारांसाठी दिलासादायक ठरणाऱ्या महत्त्वपूर्ण निरीक्षणात न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, बिल्डरांनी ठरलेल्या मुदतीत घराचा ताबा न दिल्यास आणि सबव्हेन्शन (डीलींशिपीळेप) योजनेचा गैरफायदा घेतल्याचे आढळल्यास, बँका खरेदीदारांकडून जबरदस्तीने ईएमआय (एचख) वसूल करू शकत नाहीत. या निरीक्षणामुळे देशभरातील हजारो गृहखरेदीदारांना मोठा आधार मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

रिअल इस्टेट क्षेत्रात अनेक वर्षांपासून काही बिल्डरांकडून 'सबव्हेन्शन योजना' राबविल्या जात होत्या. या योजनांमध्ये घर पूर्ण होईपर्यंत किंवा ताबा मिळेपर्यंत ईएमआयची जबाबदारी बिल्डर उचलणार, असे आश्वासन देऊन ग्राहकांना आकर्षित केले जात होते. मात्र, अनेक प्रकल्प रखडल्याने बिल्डरांनी बँकांना देयके भरणे थांबविले. परिणामी, बँकांनी थेट घर खरेदीदारांकडून ईएमआयची वसुली सुरू केली. घराचा ताबा मिळाला नसतानाही ईएमआय भरण्याची वेळ आल्याने हजारो ग्राहक आर्थिक अडचणीत सापडले.



याच पार्श्वभूमीवर न्यायालयाने महत्त्वपूर्ण भूमिका घेत ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करण्यावर भर दिला आहे. न्यायालयाने नमूद केले की, बिल्डर आणि वित्तीय संस्थांमधील व्यवहारातील त्रुटी किंवा गैरव्यवहाराचा आर्थिक फटका निष्पाप घर खरेदीदारांना बसता कामा नये. विशेषतः बिल्डरांनी करारातील अटींचे उल्लंघन केले असेल किंवा सबव्हेन्शन योजनेचा गैरवापर झाला असेल, तर त्याची शिक्षा ग्राहकांना देता येणार नाही.

न्यायालयाच्या या निरीक्षणामुळे बँका आणि गृहनिर्माण वित्त संस्थांनाही ग्राहकांच्या तक्रारी गांभीर्याने घ्याव्या लागणार आहेत. प्रकल्प रखडलेला असताना किंवा बिल्डरकडून कराराचे उल्लंघन झालेले असताना केवळ कर्ज कराराचा आधार घेऊन ग्राहकांकडून ईएमआयची सक्ती करणे योग्य ठरणार नाही, असा स्पष्ट संदेश या निरीक्षणातून देण्यात आला आहे.

रिअल इस्टेट क्षेत्रात गेल्या काही वर्षांत रखडलेल्या प्रकल्पांची संख्या वाढल्याने लाखो गृहखरेदीदार आर्थिक आणि मानसिक तणावाचा सामना करत आहेत. अनेकांनी घराचा ताबा न मिळताही भाडे आणि ईएमआय असा दुहेरी आर्थिक भार सहन केला आहे. अशा परिस्थितीत न्यायालयाच्या या भूमिकेमुळे ग्राहकांच्या हक्कांना बळ मिळेल आणि बिल्डर तसेच वित्तीय संस्थांची जबाबदारी अधिक स्पष्ट होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

कायदेतज्ज्ञांच्या मते, हा निर्णय भविष्यातील तत्सम प्रकरणांसाठी महत्त्वाचा संदर्भ ठरू शकतो. तसेच गृहखरेदीदारांनी कर्ज करार, सबव्हेन्शन योजनेच्या अटी आणि बिल्डरकडून दिली जाणारी आश्वासने यांची सखोल पडताळणी करूनच व्यवहार करावा, असा सल्लाही तज्ज्ञांनी दिला आहे.

## उद्धव ठाकरेंना सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा? अपात्रतेचा निकालच ठरणार शिवसेनेच्या भवितव्याचा निर्णायक आधार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

शिवसेना पक्ष आणि पक्षचिन्ह वादाच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या महत्त्वपूर्ण निरीक्षणांमुळे उद्धव ठाकरे गटाला मोठा कायदेशीर दिलासा मिळाल्याची चर्चा सुरू झाली आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, आमदारांच्या अपात्रतेचा प्रश्न आणि पक्षचिन्हाचा वाद हे दोन स्वतंत्र मुद्दे आहेत. अपात्रतेवर अंतिम निर्णय झाल्यानंतर पक्षचिन्हाचा प्रश्न दुय्यम ठरू शकतो, असे न्यायालयाने नमूद केले.

सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती बागची यांनी स्पष्ट केले की, अपात्रतेचा निर्णय घेताना एखाद्या आमदाराने स्वेच्छेने मूळ राजकीय पक्षाचे सदस्यत्व सोडले



का, हा सर्वात महत्त्वाचा निकष असेल. केवळ विधिमंडळ पक्षातील बदल म्हणजे मूळ राजकीय पक्षाचा त्याग होत नाही, असे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले.

उद्धव ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी विधानसभा अध्यक्षांनी अपात्रतेच्या याचिकांवर वेळेत निर्णय न घेतल्यामुळेच राजकीय समीकरणे बदलली, असा दावा केला. निवडणूक आयोगाने संघटनात्मक बहुमताऐवजी केवळ विधिमंडळातील संख्याबळाला महत्त्व दिल्याने सरकार, पक्ष आणि पक्षचिन्ह शिंदे गटाला मिळाल्याचा आरोपही त्यांनी केला.

सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी राजकीय पक्षांतील अंतर्गत लोकशाहीवरही प्रश्न उपस्थित करत, लोकशाही केवळ संस्थांमध्ये नव्हे तर पक्षांच्या कार्यपद्धतीतही दिसली पाहिजे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने अद्याप कोणताही अंतिम निकाल दिलेला नाही. मात्र अपात्रतेच्या मुद्द्याला दिलेले महत्त्व पाहता, पुढील सुनावणी राज्याच्या राजकारणासाठी निर्णायक ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## ड्युटीवर रील्स केल्या तर कारवाई अटळ! ' एसटी कर्मचाऱ्यांसाठी सोशल मीडियावर कडक निर्बंध; नव्या आचारसंहितेची अंमलबजावणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) कर्मचाऱ्यांच्या सोशल मीडिया वापरावर मोठी मर्यादा आणत नवी आचारसंहिता लागू केली आहे. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी जारी केलेल्या परिपत्रकानुसार, ड्युटीवर, गणवेशात किंवा एसटीच्या परिसरात रील्स, व्हिडिओ किंवा लाईव्ह स्ट्रीमिंग करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे.

महामंडळाच्या म्हणण्यानुसार, एसटीची प्रतिमा जपणे, प्रवाशांची सुरक्षितता सुनिश्चित करणे आणि संवेदनशील माहिती बाहेर जाण्यापासून रोखणे हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश आहे. नव्या नियमांनुसार चालक, वाहक आणि इतर कर्मचाऱ्यांना बस, आगार, बसस्थानक किंवा कार्यालयीन परिसरात गणवेशात व्हिडिओ अथवा रील्स तयार करण्यास पूर्ण बंदी असेल. विशेषतः वाहन चालवताना मोबाईलवर व्हिडिओ शूट करणे, रील्स बनवणे किंवा लाईव्ह येणे हे गंभीर शिस्तभंग मानले जाणार आहे.

याशिवाय, एसटीशी संबंधित गोपनीय कागदपत्रे, संवेदनशील छायाचित्रे किंवा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करण्यासही मनाई करण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन विभागीय चौकशीसह कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, सोशल मीडियावर सकारात्मक प्रभाव असलेल्या कर्मचाऱ्यांचा वापर महामंडळ जनजागृतीसाठी करणार आहे. प्रवासी सुविधा, स्वच्छता, रस्ते सुरक्षा आणि लोककल्याणकारी उपक्रमांचा प्रचार करण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीनंतरच अधिकृत आशय प्रसारित करण्याची मुभा असेल. त्यामुळे एसटीने सोशल मीडिया पूर्णपणे बंद न करता, 'नियंत्रित आणि जबाबदार वापर' या भूमिकेला प्राधान्य दिल्याचे या निर्णयातून स्पष्ट झाले आहे.

## संप मागे घ्या, अन्यथा जबाबदारी तुमची! ' उच्च न्यायालयाचा निवासी डॉक्टरांना स्पष्ट इशारा; सरकारची भूमिकाही ठाम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई । प्रतिनिधी

होमिओपॅथी डॉक्टरांच्या महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमधील नोंदणीच्या वादावरून राज्यभर सुरू झालेल्या निवासी डॉक्टरांच्या संपावर मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी कठोर भूमिका घेत, संप तात्काळ मागे घ्या आणि रुग्णसेवा सुरू करा, असे स्पष्ट निर्देश दिले. न्यायालयाने इशारा दिला की, संपामुळे रुग्णांचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित डॉक्टरांवरच राहील.

न्यायालयाच्या या कठोर भूमिकेनंतर महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स (मार्ड) यांनी संप मागे घेण्याची तयारी दर्शवली. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही स्पष्ट केले की, राज्य सरकार उच्च न्यायालयाच्या प्रत्येक निर्देशाचे काटेकोर पालन करेल आणि न्यायालय जो अंतिम निर्णय देईल त्यानुसारच पुढील कार्यवाही केली जाईल. राज्य सरकारने होमिओपॅथी डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल अंतर्गत नोंदणीची परवानगी देण्याच्या निर्णयाविरोधात मार्डने बुधवारपासून बेमुदत संप पुकारला होता. या आंदोलनामुळे सरकारी रुग्णालयांतील आरोग्यसेवा विस्कळीत होण्याची शक्यता निर्माण झाल्याने न्यायालयाने गंभीर चिंता व्यक्त केली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, डॉक्टरांना वेतन मिळत असताना त्यांनी रुग्णसेवा करणे ही त्यांची प्राथमिक जबाबदारी आहे. न्यायालयाचे आदेश सरकारसाठी बंधनकारक आहेत आणि आम्ही त्यानुसारच काम करत आहोत. कोणत्याही एका वैद्यकीय पद्धतीची बाजू न घेता न्यायालय जे निर्देश देईल, त्याचे पालन केले जाईल. फडणवीस यांनी पुढे स्पष्ट केले की, एमबीबीएस डॉक्टरांचे योगदान महत्त्वाचे आहे, मात्र सरकार प्रत्येक वैद्यकीय शाखेचा समान सन्मान करते. जर न्यायालयाने स्वतंत्र नोंदणीची व्यवस्था ठेवण्याचे निर्देश दिले, तर सरकार त्याचीही अंमलबजावणी करेल.

## कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्यामागे सरकारचा कट? मनोज जरांगे यांचा गंभीर आरोप; मराठे पुन्हा रस्त्यावर उतरतील इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

जालना । प्रतिनिधी

मराठवाड्यात कुणबी प्रमाणपत्र मिळालेल्या चार मराठा लोकप्रतिनिधींची प्रमाणपत्रे जात पडताळणी समितीने अवैध ठरवल्यानंतर मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर गंभीर आरोप करत तीव्र संताप व्यक्त केला. अंतरवाली सराटी येथे पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्याचा हा सरकारचा कट आहे. माझ्या अंगावर येऊ नका; मी चिडलो तर कुणालाही सोडणार नाही, असा थेट इशारा दिला.

जरांगे यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावरही निशाणा साधत, मराठ्यांनी गाफील राहू नये. गरज पडल्यास पुन्हा मोठे आंदोलन उभारावे लागेल, असे आवाहन केले. मराठा समाजाने आरक्षणासाठी आवश्यक नोंदी आणि पुरावे सादर करूनही राजकीय स्वार्थातून प्रमाणपत्रे रद्द केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री बावनकुळे आणि राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावरही त्यांनी टीका केली.

एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करताना जरांगे म्हणाले, मराठ्यांनी तुमच्यावरील गद्दारीचा डाग पुसला, पण आता डबल गेम करू नका. चांगली कामे करा.

दरम्यान, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे सर्व आरोप फेटाळले आहेत. त्यांनी स्पष्ट केले की, जात पडताळणी समिती ही स्वतंत्र यंत्रणा असून तिच्या निर्णयात सरकार किंवा कोणत्याही मंत्र्याला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. समितीच्या निर्णयाविरोधात संबंधितांना उच्च न्यायालयात दाद मागण्याचा कायदेशीर मार्ग खुला असल्याचेही त्यांनी सांगितले.

या घडामोडींमुळे मराठा आरक्षण आणि कुणबी प्रमाणपत्रांच्या वादाला पुन्हा राजकीय आणि सामाजिक धार मिळण्याची चिन्हे दिसत असून, पुढील काळात या प्रश्नावर संघर्ष तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# मोफत यूपीआय व्यवहारांचा शेवट?

## लोकसभेत विधेयक मंजूर; डिजिटल व्यवहारांवर शुल्काचा मार्ग मोकळा, सर्वसामान्यांच्या खिशावर नवा भार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

देशभरात कोट्यवधी नागरिकांचा दैनंदिन व्यवहाराचा अविभाज्य भाग बनलेल्या यूपीआय (एकत्रित देयक प्रणाली) संदर्भात लोकसभेत गुरुवारी महत्त्वाचे विधेयक मंजूर करण्यात आले. देयके आणि निपटारा प्रणाली (सुधारणा) विधेयक मंजूर झाल्यानंतर केंद्र सरकारला बँका आणि इतर देयक सेवा पुरवठादारांना यूपीआयसह अधिसूचित डिजिटल व्यवहारांवर शुल्क आकारण्याची परवानगी देण्याचा अधिकार मिळणार आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे, या विधेयकामुळे तात्काळ यूपीआयवर शुल्क लागू झालेले नाही. मात्र, भविष्यात सरकारला अशा शुल्काला परवानगी देण्याचा कायदेशीर अधिकार मिळाल्याने सर्वसामान्य नागरिक, लहान व्यापारी आणि डिजिटल व्यवहारांवर अवलंबून असलेले कोट्यवधी ग्राहक यांच्यात चिंता वाढली आहे.

गेल्या काही वर्षांत मोफत, तत्काळ आणि सुलभ व्यवहार ही यूपीआयची सर्वात मोठी ओळख ठरली. चहाच्या टपरीपासून भाजी विक्रेत्यापर्यंत, रिक्षाचालकापासून मोठ्या दुकानांपर्यंत सर्वांनी रोख व्यवहाराऐवजी क्यूआर संकेतांचा स्वीकार केला. सरकारनेही डिजिटल अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी यूपीआयला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले. आता त्याच व्यवहारांवर शुल्क आकारण्याची शक्यता निर्माण झाल्याने डिजिटल व्यवहारांचा खर्च थेट नागरिकांच्या खिशातून जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

जर भविष्यात व्यवहारांवर शुल्क लागू झाले, तर त्याचा सर्वाधिक परिणाम लहान रकमेचे वारंवार व्यवहार करणाऱ्या सामान्य नागरिकांवर आणि सूक्ष्म व्यापाऱ्यांवर होऊ शकतो. किराणा, औषधे, प्रवास, भाजीपाला किंवा दैनंदिन खरेदीसाठी यूपीआय वापरणाऱ्या ग्राहकांना प्रत्येक व्यवहारामागे अतिरिक्त रक्कम मोजावी लागू शकते. व्यापाऱ्यांवर शुल्काचा भार पडल्यास त्याचा परिणाम वस्तूंच्या किमतींवरही होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याहून मोठा प्रश्न म्हणजे, डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देणारे सरकार आता त्याच व्यवहारांवर शुल्क आकारण्याचा मार्ग का मोकळा करत आहे? रोखविरहित अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणाऱ्या धोरणाशी हा निर्णय विसंगत ठरेल का, अशी चर्चाही सुरू झाली आहे.

दरम्यान, हे विधेयक विरोधकांच्या घोषणाबाजीमुळे कोणतीही सविस्तर चर्चा न होताच लोकसभेत मंजूर झाले, ही बाबही लक्षवेधी ठरली आहे. अशा व्यापक परिणाम करणाऱ्या कायद्यावर संसदेत सखोल चर्चा न होणे, हा स्वतंत्र चिंतेचा विषय असल्याचे मत तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

सध्या नागरिकांना यूपीआय व्यवहारांसाठी कोणतेही नवे शुल्क भरावे लागणार नाही. मात्र, या विधेयकामुळे भविष्यात शुल्क आकारण्याचा कायदेशीर मार्ग खुला झाला आहे. त्यामुळे आता सर्वसामान्यांच्या नजरा केंद्र सरकारच्या पुढील निर्णयाकडे लागल्या आहेत. डिजिटल व्यवहारांची क्रांती अधिक महाग होणार की सरकार नागरिकांना दिलासा देणार, याचे उत्तर आगामी धोरणातूनच स्पष्ट होईल.

## संपादकीय

### लोकशाहीचा नवा अध्याय की न्यायालयांवर वाढता राजकीय भार? प्रत्येक निर्णय कोर्टातच का?

भारतीय लोकशाहीत एक लक्षणीय बदल गेल्या काही वर्षांत स्पष्टपणे जाणवू लागला आहे. एकेकाळी राजकीय संघर्ष संसदेत, विधानसभेत, जनआंदोलनांत किंवा थेट जनतेसमोर लढले जात होते. आज मात्र जवळपास प्रत्येक महत्त्वाचा राजकीय, प्रशासकीय किंवा धोरणात्मक वाद उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचताना दिसतो. सरकारचा निर्णय असो, निवडणूक आयोगाची कार्यपद्धती, आरक्षण, नियुक्त्या, आंदोलनांवरील कारवाई, पर्यावरण, धार्मिक प्रश्न किंवा सोशल मीडियावरील निर्बंधअखेरीस निर्णयाची अपेक्षा न्यायालयाकडूनच केली जाते. हा लोकशाहीच्या बळकटीकरणाचा संकेत आहे की इतर संस्थांवरील घटत्या विश्वासाचा, हा गंभीर प्रश्न आहे. भारतीय राज्यघटनेने नागरिकांना अनुच्छेद ३२ आणि अनुच्छेद २२६ अंतर्गत न्यायालयात जाण्याचा मूलभूत अधिकार दिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुच्छेद ३२ ला राज्यघटनेचे हृदय आणि आत्मा म्हटले होते. त्यामुळे नागरिकांनी न्यायालयाचे दार ठोठावणे हे लोकशाहीच्या चौकटीत पूर्णपणे वैध आहे. जेव्हा कार्यपालिका किंवा प्रशासनाकडून न्याय मिळत नाही, तेव्हा न्यायालय नागरिकांचा शेवटचा घटनात्मक आधार ठरते. त्यामुळे याचिकांची संख्या वाढणे हे काही प्रमाणात न्यायव्यवस्थेवरील विश्वासाचेही प्रतीक मानता येते. मात्र या चित्राची दुसरी बाजू अधिक चिंताजनक आहे. आज अनेक राजकीय प्रश्न न्यायालयात पोहोचण्यामागे केवळ घटनात्मक हक्कांचे संरक्षण हा उद्देश नसतो; अनेकदा राजकीय रणनीतीचाही भाग असतो. निवडणुकीतील पराभवानंतरचे वाद, सरकारच्या नियुक्त्या, चौकशी यंत्रणांची कारवाई, विधिमंडळातील निर्णय, आंदोलनांवरील कारवाईअनेक विषय प्रथम राजकीय पातळीवर न सुटता थेट न्यायालयात नेले जातात. यामुळे लोकशाहीतील राजकीय संवाद आणि संस्थात्मक तोडग्यांची क्षमता कमी होत असल्याची भावना निर्माण होते. २०२६ मधील घडामोडींकडे पाहिल्यास ही प्रवृत्ती अधिक ठळक दिसते. विद्यार्थ्यांच्या आंदोलनांशी संबंधित प्रकरणे, निवडणूक प्रक्रियेवरील आक्षेप, तरुण वकिलांच्या स्टायपेंडचा प्रश्न, नियुक्त्या, आरक्षण, स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार, पर्यावरणीय निर्णय अशा विविध विषयांवर न्यायालयांना हस्तक्षेप करावा लागला. यातील अनेक प्रश्नांचे मूळ राजकीय किंवा प्रशासकीय असले, तरी अंतिम उत्तर न्यायालयाकडूनच अपेक्षित होते. याचा सर्वात मोठा परिणाम न्यायव्यवस्थेवर होतो. देशातील न्यायालयांमध्ये आधीच कोट्यवधी खटले प्रलंबित आहेत. सामान्य नागरिकांची दिवाणी, फौजदारी, कौटुंबिक किंवा मालमत्तेची प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. अशा परिस्थितीत प्रत्येक राजकीय संघर्ष न्यायालयात नेला गेला, तर न्यायालयांचा वेळ आणि संसाधने अधिकच ताणली जाणार, हे वास्तव आहे. परिणामी न्याय मिळण्यास होणारा विलंब ही समस्या आणखी गंभीर होऊ शकते. मात्र या चर्चेत न्यायालयांवर टीका करण्याइतकेच इतर घटनात्मक संस्थांकडेही पाहण्याची गरज आहे. संसदेत प्रभावी चर्चा होत नसल्याची टीका वारंवार होते. संसदीय समित्यांची भूमिका मर्यादित होत असल्याची भावना व्यक्त केली जाते. स्वायत्त संस्थांच्या निर्णयांवर सातत्याने प्रश्न उपस्थित होतात. अशा परिस्थितीत नागरिक किंवा विरोधी पक्ष न्यायालयाकडे वळतात, हेही तितकेच वास्तव आहे. म्हणजेच वाढत्या याचिका हे केवळ न्यायालयांचे नव्हे, तर लोकशाहीतील संस्थात्मक संतुलनाचेही प्रतिबिंब आहे. याच ठिकाणी सत्ताविभाजनाच्या तत्त्वाचा विचार महत्त्वाचा ठरतो. विधिमंडळाने कायदे करणे, कार्यपालिकेने त्यांची अंमलबजावणी करणे आणि न्यायपालिकेने त्यांची घटनात्मक तपासणी करणे, ही भारतीय लोकशाहीची मूलभूत रचना आहे. जर प्रत्येक धोरणात्मक किंवा राजकीय प्रश्नाचा अंतिम निर्णय न्यायालयाकडूनच अपेक्षित असेल, तर या संतुलनावर परिणाम होऊ शकतो. दुसरीकडे, जर कार्यपालिका आणि विधिमंडळ आपली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडत नसतील, तर न्यायपालिकेने पूर्णपणे अलिप्त राहावे, अशी अपेक्षाही वास्तववादी ठरणार नाही. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर कोणत्याही एका टोकाला नाही. भारतीय लोकशाहीची ताकद ही संस्थांमधील समतोल, परस्पर उत्तरदायित्व आणि नागरिकांचा विश्वास यात आहे. न्यायालये ही लोकशाहीची संरक्षक आहेत; परंतु ती लोकशाहीची एकमेव आधारस्तंभ नाहीत. संसद, विधानमंडळे, निवडणूक आयोग, स्वायत्त संस्था, माध्यमे आणि नागरिक समाज यांचीदेखील तितकीच महत्त्वाची भूमिका आहे. या संस्था सक्षम, पारदर्शक आणि विश्वासार्ह असतील, तर प्रत्येक प्रश्न न्यायालयात नेण्याची गरज कमी होईल. आजचा मूलभूत प्रश्न न्यायालयांनी किती हस्तक्षेप करावा हा नाही; तर इतर लोकशाही संस्था इतक्या सक्षम आहेत का की नागरिकांचा विश्वास त्यांच्यावर टिकून राहील? कारण लोकशाहीचे अंतिम केंद्र न्यायालय नसते, संसदही एकटी नसतेलोकशाहीचे खरे केंद्र नागरिकांचा विश्वास असतो. तो विश्वास सर्व घटनात्मक संस्थांनी आपल्या कार्यातून कमावला, तर न्यायालयांकडे धाव घेण्याची गरज नैसर्गिकरीत्या कमी होईल. आणि कदाचित तेव्हाच भारतीय लोकशाही अधिक परिपक्व आणि संतुलित असल्याचे म्हणता येईल.

# भामा-आसखेड प्रकल्पग्रस्तांना आश्वासनांचा डोस; विकासकामे टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्याचे महापौरांचे आश्वासन

## शहराचा पाणीपुरवठा अबाधित ठेवत प्रकल्पग्रस्तांच्या न्याय्य मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेण्याचा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

भामा-आसखेड जलवाहिनी प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शिवे-वाकी तर्फे वाडा येथील ग्रामस्थांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर गुरुवारी महापौर रवि लांडगे यांच्यासोबत बैठक झाली. या बैठकीत ग्रामस्थांनी गावातील विकासकामे आणि प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांबाबत निवेदन सादर करत तातडीने कार्यवाहीची मागणी केली. त्यावर महापौरांनी शहराच्या पाणीपुरवठ्याला कोणतीही बाधा न आणता प्रकल्पग्रस्तांच्या न्याय्य मागण्या आणि गावाच्या विकासकामांवर टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.



बैठकीत गावातील पाणीपुरवठा, जलवाहिनीची प्रलंबित कामे, अंतर्गत रस्ते, कॉँक्रिटीकरण, वीजपुरवठा, सांडपाणी व गटार व्यवस्था, कचरा व्यवस्थापन, स्मशानभूमीचे सुशोभीकरण, मंदिर परिसरातील सुविधा, सभागृह, खेळाचे मैदान, वृक्षारोपण आणि इतर मूलभूत सुविधांबाबत सविस्तर चर्चा झाली. तसेच भामा-आसखेड प्रकल्पामुळे बाधित ग्रामस्थांच्या प्रलंबित प्रश्नांवर महापालिका प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

महापौर रवि लांडगे यांनी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत संबंधित विभागांकडून प्रत्येक मागणीची माहिती घेत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. प्रकल्पग्रस्तांच्या न्याय्य मागण्या आणि गावाच्या विकासकामांबाबत सकारात्मक भूमिका घेत टप्प्याटप्प्याने कामे मार्गी लावण्याबाबत प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. महापौर लांडगे म्हणाले की, भामा-आसखेड प्रकल्प हा पिंपरी-चिंचवडच्या भविष्यातील पाणीपुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असून शहराच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार नाही, याची काळजी घेत प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांवरही संवेदनशीलतेने निर्णय घेतले जातील. संबंधित विभागांशी समन्वय साधून प्रलंबित विकासकामांना गती देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, प्रकल्पग्रस्तांनी यापूर्वीही अनेकदा विकासकामे आणि पुनर्वसनाशी संबंधित प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यामुळे या बैठकीतील आश्वासनांचे प्रत्यक्ष कामांमध्ये रूपांतर कधी होणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# तीन वर्षांत २९१ अपघात, १४४ बळी; ब्लॅक स्पॉटवर मृत्यूंचे 'ब्लॅक रेकॉर्ड'

■ दैनिक राज्य लोकतंत्र



पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील महामार्गांवरील १५ 'ब्लॅक स्पॉट' आजही वाहनचालकांसाठी मृत्यूचे सापळे ठरत आहेत. २०२२ ते २०२४ या तीन वर्षांत या ठिकाणी २९१ अपघात झाले असून, त्यात १४४ जणांचा मृत्यू झाला आहे. तरीही अपघातांची कारणे दूर करण्याऐवजी केवळ आढावा बैठका, पत्रव्यवहार आणि सूचनांपुरतीच यंत्रणेची धावपळ सुरू असल्याचे चित्र आहे.

पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखा आणि पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभाग (आरटीओ) अपघातप्रवण ठिकाणांची पाहणी करून रस्त्यांतील त्रुटी, अपुरे सूचना फलक, धोकादायक वळणे, अपुरा प्रकाश, चुकीची रचना, वेग नियंत्रणाच्या उपाययोजना आदींबाबत शिफारशी करतात. मात्र, संबंधित महामार्ग प्राधिकरणे आणि यंत्रणांकडून त्या शिफारशींची अंमलबजावणी अपेक्षित गतीने होत नसल्याने अपघातांचे दुष्टचक्र कायम आहे.

सर्वाधिक धोकादायक ठरलेल्या पुणे-नाशिक महामार्गावरील चाकणच्या तळेगाव चौकात तीन वर्षांत ७२ अपघात झाले. २९ जणांचा मृत्यू झाला आहे.

त्यानंतर मेदनकरवाडी फाटा येथे १८, वाकी येथे १६ आणि उर्से टोलनाका येथे १३ जणांचा बळी गेला. मुंबई-बंगळुरू महामार्गावरील किवळे पूल, पुनावळे पूल, वाकड नाका, चांदणी चौक, बावधन येथील ऑडी शोरूम परिसर आणि सुतारवाडी पूल ही ठिकाणेही धोकादायक ठरत आहेत. अनेक अपघातप्रवण ठिकाणांची (ब्लॅक स्पॉट) नोंद अनेक वर्षांपासून कायम आहे. अपघातांची संख्या आणि मृतांचा आकडा वाढत असताना कायमस्वरूपी अभियांत्रिकी सुधारणा, वाहतूक व्यवस्थापन आणि सुरक्षा उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी झालेली दिसत नाही. परिणामी, प्रत्येक अपघातानंतर चौकशी होते; मात्र पुढील अपघात टाळण्यासाठी आवश्यक बदल प्रत्यक्षात होत नाही.

# १० लाखांची मदत म्हणजे न्याय नाही मोशी कचरा डेपो दुर्घटना प्रकरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी । प्रतिनिधी

१० लाखांची मदत म्हणजे न्याय नाही; मोशी दुर्घटनेनंतर जबाबदारीचा प्रश्न कायममोशी कचरा डेपो दुर्घटनेत मृत्यू झालेल्या सात कर्मचाऱ्यांच्या वारसांच्या खात्यात प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत पिंपरी-चिंचवड महापालिकेने जमा केली आहे. मात्र, भरपाईचा धनादेश मृत कर्मचाऱ्यांचे आयुष्य परत आणू शकत नाही, ही वस्तुस्थिती बदलत नाही.

८ जुलैच्या दुर्घटनेत नऊ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला होता. त्यापैकी सात जणांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळाली असली, तरी दोन मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांची कागदपत्रे अपूर्ण असल्याने त्यांना अद्याप मदत मिळालेली नाही.

महापालिका प्रशासन आर्थिक मदतीची प्रक्रिया वेगाने राबवत असल्याचा दावा करत असले, तरी या दुर्घटनेला जबाबदार असलेल्या अधिकारी, कंत्राटदार आणि संबंधित यंत्रणांवर ठोस कारवाई झाली का? हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे. मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार मिळणे आवश्यक असले, तरी केवळ भरपाई देऊन निष्काळजीपणाची जबाबदारी संपत नाही, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत. दुर्घटनेनंतर सुरक्षा उपाययोजनांमध्ये काय सुधारणा करण्यात आल्या, दोषींवर कोणती दंडात्मक कारवाई झाली आणि भविष्यात अशी दुर्घटना टाळण्यासाठी कोणती पावले उचलली गेली, याबाबतही प्रशासनाने स्पष्ट उत्तर देण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे. मृतांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी केवळ आर्थिक मदत नव्हे, तर जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई होणेही तितकेच आवश्यक असल्याची मागणी पुन्हा जोर धरत आहे.

# बिर्ला हॉस्पिटलजवळील पुलाचे तुटलेले कठडे तातडीने दुरुस्त करा; शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे यांची आक्रमक मागणी

## मुसळधार पाऊस व पुराच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न; महापालिका आयुक्तांकडे निवेदन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

मुसळधार पाऊस आणि पुराच्या पाण्यामुळे बिर्ला हॉस्पिटलजवळील पुलावरील तुटलेले कठडे नागरिकांच्या जीवितासाठी धोकादायक ठरत असल्याने ते तातडीने दुरुस्त करण्यात यावेत, अशी आक्रमक मागणी शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

बारणे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या सुरू असलेल्या पावसामुळे पुलावरून नागरिक, दुचाकीस्वार आणि वाहनचालकांची मोठ्या प्रमाणावर ये-जा सुरू असते. अशा परिस्थितीत पुलाचे कठडे तुटलेल्या अवस्थेत असल्याने कोणत्याही क्षणी गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या



दृष्टीने तातडीने दुरुस्तीची कामे हाती घेणे आवश्यक आहे. त्यांनी महापालिका प्रशासनाने पुलाची पाहणी करून तुटलेले कठडे त्वरित दुरुस्त करावेत, आवश्यक त्या ठिकाणी सुरक्षारक्षक कठडे व इशारा फलक बसवावेत तसेच अपघात टाळण्यासाठी अतिरिक्त सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली.

बारणे यांनी प्रशासनाला इशारा देताना सांगितले की, संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने कार्यवाही होणे गरजेचे आहे. नागरिकांच्या जीविताशी संबंधित या प्रश्नाकडे दुर्लक्ष झाल्यास शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व धोकादायक पूल व रस्त्यांचीही तातडीने तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करण्याची मागणी त्यांनी केली.

# पिंपरी-चिंचवडला स्वतंत्र विशेष मोटार वाहन न्यायालयाची मंजुरी

## अपघात नुकसानभरपाई प्रकरणांचा जलद निपटारा होणार; नागरिकांना मोठा दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी : प्रतिनिधी

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती लोकसंख्या, वाहनांची वाढती संख्या आणि अपघात नुकसानभरपाईच्या प्रकरणांचा वाढता भार लक्षात घेऊन राज्य शासनाने पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र विशेष मोटार वाहन अपघात दावे न्यायाधिकरण (चेींअॅ अललळवशपीं उश्ररळाी ढअॅळलीपरश्र - चअउढ) स्थापन करण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे अपघातग्रस्त आणि त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळण्याची प्रक्रिया अधिक जलद आणि सुलभ होणार आहे.

यापूर्वी पिंपरी-चिंचवडमधील मोटार अपघात नुकसानभरपाईची प्रकरणे प्रामुख्याने पुणे येथील न्यायाधिकरणात चालत होती. त्यामुळे नागरिकांना वारंवार पुण्यात जावे लागत होते तसेच प्रकरणांच्या निपटाऱ्यास विलंब होत होता. स्वतंत्र न्यायालय सुरू झाल्यानंतर हा ताण कमी होण्यास मदत होणार आहे.

शहरातील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर विमा दावे, नुकसानभरपाई आणि संबंधित न्यायालयीन प्रक्रिया अधिक वेगाने पूर्ण होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच वकील, विमा कंपन्या आणि सर्वसामान्य नागरिकांसाठीही ही सुविधा अधिक सोयीची ठरणार आहे.

कायदेतज्ज्ञांच्या मते, स्वतंत्र विशेष मोटार वाहन न्यायालयामुळे प्रलंबित प्रकरणांचा निपटारा वेगाने होण्यास मदत होईल आणि अपघातग्रस्तांना नुकसानभरपाईसाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागणार नाही. हा निर्णय पिंपरी-चिंचवडसारख्या वेगाने विस्तारत असलेल्या शहरासाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

### मशिनरी पोहोचवण्याच्या नावाखाली १ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक; पिंपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

पिंपरी: मशिनरी हरियाणामध्ये पोहोचवण्याचे कंत्राट घेऊन १ लाख ५० हजार रुपयांचे भाडे स्वीकारल्यानंतरही माल न पोहोचवता चालकाने व ब्रोकरने आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आकुर्डी येथील 'जीएसएम कार्गो अँड लॉजिस्टिक्स' या कंपनीला चाकण येथील एका कंपनीतून ''कोल्ड चेंबर डाई कास्टिंग मशिन'' हरियाणामध्ये ट्रान्सपोर्ट करण्याचे कंत्राट मिळाले होते. यासाठी ब्रोकर मोहम्मद जुबेर (रा. चाकण-शिक्रापूर रोड, मोशी) याच्यामार्फत लुकमान नावाच्या चालकाची गाडी (क्रमांक कळ ७३ इ ८९७०) ठरवण्यात आली.

भाड्यापोटी एकूण १ लाख ५० हजार रुपये (ब्रोकर जुबेर याच्या बँक खात्यावर ७० हजार आणि चालक लुकमान याच्या स्कॅनरवर ८० हजार) ऑनलाइन देण्यात आले. मात्र, रक्कम स्वीकारल्यानंतरही आरोपींनी सदर माल नियोजित ठिकाणी न पोहोचवता कंपनीची १ लाख ५० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केली. या प्रकरणी महिला फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पिंपरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक इंगळे पुढील तपास करत आहेत.

### जुन्या वादातून दोघांवर कोयत्याने व लाथाबुक्क्यांनी हल्ला; कासारवाडीतील घटना

दापोडी: कासारवाडी येथील स्मशानभूमीसमोर जुन्या भांडणाच्या कारणावरून तिघांनी मिळून दोन तरुणांवर लाथाबुक्क्यांनी मारहाण करत कोयत्याने हल्ला केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी दापोडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

रेहमान जब्बार सिद्दीकी (वय १९, रा. कासारवाडी) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्यांचा मित्र अभिषेक हे दोघे आपल्या दुचाकीवरून जात असताना मोहम्मद शेख, अमन बागवान आणि समिर (सर्व रा. कासारवाडी) या तिघांनी त्यांना रस्ता अडवून अडवले.

आरोपींनी जुन्या वादाचा राग मनात धरून फिर्यादी व त्यांच्या मित्राला शिवीगाळ करत तोंडावर चापट मारली. त्यानंतर तिघांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करत आरोपीने अभिषेकच्या डोक्यात कशाने तरी मारून त्याला गंभीर जखमी केले, तसेच दुचाकीची तोडफोड करून नुकसान केले. दापोडी पोलीस या प्रकरणी पुढील तपास पोलीस हवालदार गारडे करत आहेत.

### भाजी विक्रीच्या कारणावरून वाद; पिंपरीच्या गणेश स्विट समोर रिक्षाचालकाकडून भाजी विक्रेत्याला मारहाण

पिंपरी: भाजी विक्रीच्या जागेवरून झालेल्या वादातून एका अनोळखी रिक्षाचालकाने भाजी विक्रेत्याला शिवीगाळ व मारहाण केल्याची घटना पिंपरी पुणे येथील गणेश स्विट दुकानासमोर घडली आहे.

याबाबत अक्रम रफिक खान (वय २६, रा. मिलिंदनगर, पिंपरी) यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. अक्रम खान हे भाजी विक्रीचा व्यवसाय करत असताना, त्यांच्या शेजारी भाजी विक्री करणाऱ्या एका अनोळखी रिक्षाचालकाने (रिक्षा क्र. चक १४ उण १५६७, वय ३० वर्षे अंदाजे) ''माझ्या शेजारी भाजी विक्री करू नको,'' असे म्हणत वाद घातला. या वादातून त्याने अक्रम खान यांना शिवीगाळ करत मारहाण केली. पिंपरी पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

# शिरदाळे परिसर ठरतोय मोरांचे माहेरघर

## ७०० ते ९०० मोरांची वस्ती, पर्यटनाला चालना तर शेतकऱ्यांसमोर नुकसानाचे संकट


■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील पूर्वेकडील डोंगराळ भागातील शिरदाळे परिसर सध्या मोरांच्या वाढत्या संख्येमुळे विशेष चर्चेत आला आहे. हिरवाईने नटलेल्या या परिसरात सध्या अंदाजे ७०० ते ९०० मोरांची वस्ती असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे शिरदाळे परिसराला मोरांचे माहेरघर अशी ओळख मिळू लागली आहे. मात्र, मोरांच्या वाढत्या संख्येमुळे पर्यटनाला चालना मिळत असतानाच शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसानही होत आहे.

शिरदाळे परिसरात पावसाळ्यात डोंगररांगा हिरव्यागार होतात. त्यात मोरांचे मुक्त संचार पर्यटक आणि निसर्गप्रेमींसाठी आकर्षण ठरत आहेत. सुरुवातीला ग्रामस्थांनाही मोरांचे दर्शन आनंददायी वाटत होते. मात्र, गेल्या काही वर्षांत मोरांची संख्या झपाट्याने वाढल्याने शेतकऱ्यांसमोर नवे संकट उभे राहिले आहे. पावसाळ्यात पेरणी केलेल्या विविध पिकांवर मोर ताव मारत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे.

निसर्गप्रेमी तथा माजी उपसरपंच मयूर सरडे यांनी सांगितले की, सध्या परिसरात सुमारे ७०० ते ९०० मोर असावेत. त्यांनी आपल्या कॅमेऱ्यात अनेक मोरांचे



फोटो आणि व्हिडिओही टिपले आहेत. भविष्यात ही संख्या हजाराच्या घरात पोहोचण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

शिरदाळे परिसर हा केवळ मोरांसाठीच नव्हे तर समृद्ध जैवविविधतेसाठीही ओळखला जातो. सागदरा परिसरातील सागवानाचे जंगल, शिरदाळे तलाव तसेच कोल्हे, तरस, लांडगे आणि बिबट्यांसारख्या वन्यप्राण्यांचे अधिवास या भागाचे नैसर्गिक सौंदर्य अधिक खुलवतात. जुलै ते सप्टेंबर या कालावधीत संपूर्ण परिसर हिरवाईने नटलेला असतो. याच काळात विविध रानभाज्याही येथे उपलब्ध होत असल्याने अनेक निसर्गप्रेमी आणि पर्यटक या भागाला भेट देतात. आखाड महिन्यात अनेक नागरिक या परिसरात सहली आणि वनभोजनासाठी येतात. मात्र, पर्यटकांनी निसर्गाला कोणतीही हानी न पोहोचवता स्वच्छता राखून पर्यटनाचा आनंद घ्यावा, अशी अपेक्षा स्थानिक ग्रामस्थ व्यक्त करतात. स्थानिक प्रशासनाने ग्रामस्थांच्या सहकार्याने पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक सुविधा विकसित केल्यास शिरदाळे परिसर भविष्यात एक महत्त्वाचे निसर्ग पर्यटन केंद्र म्हणून विकसित होऊ शकतो, असे मत माजी सरपंच व प्रशासक सुप्रिया मनोज तांबे, उपसरपंच बिपिन चौधरी, माजी सरपंच वंदना गणेश तांबे आणि जयश्री संतोष तांबे यांनी व्यक्त केले.

## सारांश वृत्त

### जेजुरी पोलिसांत गुन्हा दाखल: गरीब मेंढपाळाच्या पाल्यावर डल्ला मारत ४ तोळे सोने लंपास

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जेजुरी : प्रतिनिधी**

धार्मिक आणि ऐतिहासिक क्षेत्र असलेल्या जेजुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक धक्कादायक चोरीची घटना समोर आली आहे. परिसरातील एका गरीब मेंढपाळाच्या तात्पुरत्या वास्तव्यास असलेल्या पालावर अज्ञात चोरट्यांनी धाडसी दरोडा टाकला आहे. चोरट्यांनी पालातून सुमारे चार तोळे सोन्याचे दागिने लंपास केले आहेत.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, पीडित मेंढपाळ कुटुंब आपल्या जनावरांसह जेजुरी परिसरात पाळ टाकून राहत होते. कुटुंब कामात व्यस्त असताना किंवा पालात कोणी नसताना चोरट्यांनी ही संधी साधली. मेंढपाळाने अत्यंत कष्टाने कमावलेले आणि साठवून ठेवलेले ४ तोळे सोन्याचे दागिने चोरट्यांनी चोरून नेले.या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली असून, पीडित मेंढपाळाने तत्काळ स्थानिक प्रशासनाकडे धाव घेतली. याप्रकरणी जेजुरी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस या घटनेचा पुढील तपास करत असून परिसरातील संशयितांची चौकशी सुरू आहे.

### जरांगेंच्या आरोपांवर बावनकुळेंचा पलटवार; म्हणाले, आरोपांमध्ये तथ्य नाही, राजकारणासाठी वक्तव्ये

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जेजुरी : प्रतिनिधी** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या आरोपांवर भाजप नेते आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया देत जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. जरांगे यांनी केलेले आरोप तथ्यहीन असून, त्यातून राजकीय वातावरण तापवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे बावनकुळे यांनी म्हटले आहे. बावनकुळे यांनी मनोज जरांगे यांच्या वक्तव्यांवर आक्षेप घेत नेतृत्वावर होणारी टीका सहन केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत करण्यात आलेल्या वक्तव्यांवरूनही त्यांनी नाराजी व्यक्त केली होती. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर सरकारची भूमिका स्पष्ट असून, समाजातील सर्व घटकांचा विचार करून निर्णय घेतले जातील, असे बावनकुळे यांनी सांगितले. आरक्षणाचा प्रश्न संविधानिक चौकटीत सोडवला जाईल, अशी भूमिका त्यांनी मांडली. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलनाची भूमिका कायम ठेवली असून, त्यांच्या आंदोलनावरून राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे.

---

# कोट्यवधींचे नवे सभागृह, पण दर्जा निकृष्ट? मुळशी पंचायत समितीत सभापतींचा अधिकाऱ्यांना जाब

## नव्याने बांधलेल्या सभागृहाची दुरवस्था उघड; निकृष्ट कामांवर संताप, जबाबदारी निश्चित करण्याचे आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पौड (मुळशी) : प्रतिनिधी**

मुळशी पंचायत समितीच्या नव्याने उभारण्यात आलेल्या सभागृहाच्या दुरवस्थेमुळे प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. इमारतीच्या सर्वात वरच्या मजल्यावरील सभागृहाची पाहणी करताना सभापती मंदा बाबाजी शेळके यांनी निकृष्ट दर्जाच्या कामांबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांची चांगलीच खरडपट्टी काढली.

पाहणीदरम्यान नव्याने बांधलेल्या सभागृहाच्या देखभालीकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याचे निदर्शनास आले. सार्वजनिक निधीतून उभारलेल्या इमारतीची एवढ्या कमी कालावधीत झालेली दुरवस्था पाहून सभापती शेळके यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारत या निष्काळजीपणासाठी जबाबदार असलेल्यांची तातडीने जबाबदारी निश्चित करण्याचे निर्देश दिले.

या घटनेमुळे बांधकामाच्या गुणवत्तेबाबत आणि देखभाल व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. काम पूर्ण झाल्यानंतर गुणवत्ता तपासणी झाली होती का? दोषी कंत्राटदार किंवा अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का? अशा प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने देणे आवश्यक असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. दरम्यान, या प्रकरणी बांधकाम विभागाचे स्पष्टीकरण किंवा दोषींवर नेमकी कोणती कारवाई करण्यात येणार, याकडे मुळशी तालुक्याचे लक्ष लागले आहे. सार्वजनिक पैशातून उभारलेल्या इमारतींच्या दर्जाबाबत प्रशासन किती गंभीर आहे, याची ही घटना कसोटी ठरणार आहे.

---

# श्री भैरवनाथ विद्याधामचा राज्यभर झेंडा; एनएसएसई-२०२६ मध्ये तीन विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादीत चमक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी धामणी । प्रतिनिधी**

लोणी (ता. आंबेगाव) येथील श्री भैरवनाथ विद्याधाम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या एनएसएसई-२०२६ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत राज्यस्तरावर आपला ठसा उमटवला आहे. विद्यालयातील तीन विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळवत संपूर्ण आंबेगाव तालुक्याचा गौरव वाढविला आहे.

इयत्ता पाचवीतील आयुष राहुल भागवत याने २०० पैकी १८४ गुण मिळवत राज्यात सहावा क्रमांक पटकावला. इयत्ता सहावीतील सुजल संदीप आदक याने १६६ गुणांसह राज्यात पंधरावा, तर भक्ती वैभव लंके हिने १६० गुणांसह राज्यात अठरावा क्रमांक मिळवून विद्यालयाच्या यशात मानाचा तुरा खोवला.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी



**प्रेरणादायी यश**

आमच्या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सिद्ध करून दाखवले आहे की जिद्द, मेहनत आणि योग्य मार्गदर्शन असेल तर कोणतेही शिखर गाठता येते. हे यश केवळ विद्यार्थ्यांचे नसून संपूर्ण लोणी गावासाठी अभिमानाची बाब आहे. या यशामुळे विद्यालयाच्या नावलौकिकात आणखी भर पडली असून पुढील पिढ्यांसाठी हे विद्यार्थी प्रेरणास्थान ठरतील.

— प्राचार्य सुनील थोरात

राज्यस्तरीय स्पर्धेत आपले कौशल्य सिद्ध करत गुणवत्तेची नवी उंची गाठली आहे. विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचा भक्कम पाठिंबा आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन यामुळे हे यश शक्य झाल्याची भावना विद्यालयात व्यक्त करण्यात आली.

या यशाबद्दल गुणवंत विद्यार्थ्यांचे प्राचार्य सुनील थोरात, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विविध समित्यांचे पदाधिकारी, माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनी, पालक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

---

# आल्याला तेजीचा तडका! शेतातूनच १३० रुपये किलो दराने थेट खरेदी

## व्यापारी शेतात, शेतकऱ्यांचा मजुरी-वाहतूक खर्चही वाचला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यात आले पिकाला सध्या समाधानकारक बाजारभाव मिळत असल्याने आले उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. विशेष म्हणजे व्यापारी थेट शेतात येऊन आले खरेदी करत असल्याने शेतकऱ्यांचा काढणी, मजुरी आणि वाहतुकीचा खर्चही वाचत आहे. त्यामुळे निव्वळ उत्पन्नात वाढ होत असून पूर्व भागातील अनेक शेतकरी मोठ्या प्रमाणावर आले लागवडीकडे वळत आहेत.

तालुक्यातील खडकी, रांजणी, वळती, शिंगवे, पारगाव तसेच परिसरातील गावांमध्ये गेल्या काही वर्षांत आले लागवडीचे क्षेत्र सातत्याने वाढले आहे. पारंपरिक पिकांसोबत नगदी पीक म्हणून आलेकडे शेतकऱ्यांचा कल वाढताना दिसत आहे. यंदा उत्पादन समाधानकारक झाल्याने आणि बाजारभावात लक्षणीय वाढ झाल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

थोरांदळे येथील प्रगतशील शेतकरी दत्तात्रय बाळशीराम टेमगिरे यांनी दोन एकर क्षेत्रात आलेची लागवड केली आहे. सध्या त्यांच्या शेतात आले काढणीची लगबग सुरू असून व्यापाऱ्यांनी थेट शेतात येऊन खरेदी सुरू केली आहे. हंगामाच्या सुरुवातीला त्यांना ९० रुपये प्रतिकिलो दर मिळाला होता; मात्र मागणीत वाढ झाल्याने आता त्याच आल्याला १३० रुपये प्रतिकिलो दर मिळत आहे. त्यामुळे उत्पन्नात मोठी वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सध्या अनेक व्यापारी स्वतः मजुरांच्या टोळ्या घेऊन शेतात येत आहेत. आलेची काढणी, स्वच्छ धुणे, वर्गीकरण आणि वाहतुकीची संपूर्ण व्यवस्था व्यापारीच करत असल्याने शेतकऱ्यांचा वेळ आणि खर्च दोन्ही वाचत आहेत. मजुरी व वाहतूक खर्च टळल्यामुळे निव्वळ नफा वाढत असून आले लागवड अधिक फायदेशीर ठरत असल्याचे चित्र आहे.

आलेला मिळणारा सध्याचा दर आणि शेतातूनच होणारी थेट खरेदी यामुळे तालुक्यातील अनेक शेतकरी पुढील हंगामात आले लागवडीचे क्षेत्र वाढविण्याच्या तयारीत आहेत. योग्य बाजारपेठ आणि चांगला दर मिळाल्यास आले हे पूर्व भागातील शेतकऱ्यांसाठी अधिक लाभदायक नगदी पीक ठरू शकते, असा आशावादही शेतकरी व्यक्त करत आहेत.

**शेतकऱ्याची प्रतिक्रिया**

दत्तात्रय बाळशीराम टेमगिरे (शेतकरी, थोरांदळे) म्हणाले, सध्या आले पिकाला चांगला बाजारभाव मिळत आहे. व्यापारी थेट शेतात येऊन आले खरेदी करत आहेत. ते स्वतः मजुरांच्या टोळ्या घेऊन येऊन काढणी, स्वच्छ धुणे आणि वाहतूक करतात. त्यामुळे आमचा मजुरी व वाहतुकीचा खर्च पूर्णपणे वाचतो.

बाजारभावही समाधानकारक असल्याने यंदा आले पिकातून चांगले उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे.

---

# सीएनजी प्रकल्प ठेकेदाराला पोसण्यासाठी देण्याचा डाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी - चिंचवड : प्रतिनिधी**

मोशी कचरा डेपोत महापालिकेच्या वतीने बीओटी तत्त्वावर ओल्या कचऱ्यापासून बायो-सीएनजी निर्मितीचा ३७५ टन क्षमतेचा प्रकल्प सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी मर्जीतील ठेकेदाराला टीपिंग चार्जेस १०५० रुपयांऐवजी ३६६१ रुपये प्रतिटन दराने आणि १५ वर्षांसाठी काम देण्यात येणार आहे. त्यास स्थायी समितीतील राष्ट्रवादी (अजित पवार) आणि शिंदेसेनेच्या सदस्यांनी आक्षेप घेतला आहे.

याबाबत स्थायी समितीचे सदस्य शिंदेसेनेच्या नेत्या सुलभा उबाळे, राष्ट्रवादीचे नेते संदीप वाघेरे यांनी पत्रकार परिषद घेतली. कचऱ्याच्या आडून महापालिका लुटण्याचा डाव असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. मोशी कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पातील इमारत कोसळून नऊ जणांचा जीव गेला. त्यानंतर कचऱ्यातून सोने करण्याची अनेक प्रकरणे पुढे येत आहेत. महापालिकेकडून मोशी डेपोतच नवीन प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्यावरून विरोधकांनी सत्ताधारी भाजपला धारेवर धरले आहे.

यावेळी सदस्य विकास साने, नगरसेवक राजू बनसोडे उपस्थित होते. दरम्यान स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे गैरहजर असल्याने त्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली नाही. उबाळे म्हणाल्या की, राजकीय दबावामुळे या प्रकल्पास मान्यता दिली गेली आहे. निलंबित मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी प्रशासनाची फसवणूक करून या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया राबवली आहे. त्यानुसार अटी व शर्ती दाखल केल्या आहेत. पात्र ठेकेदाराकडून दुसऱ्याला काम देण्यात येईल, अशी अट त्यात टाकली आहे. त्यानुसार भाजपच ठेकेदार नेमून कचऱ्यातून मलिदा खाईल. कचऱ्याला विरोध करणारेच त्यासाठी डेपोत नवीन प्रकल्प राबवत आहेत.

संदीप वाघेरे म्हणाले की, हा एकूण १८० कोटी रुपयांचा प्रकल्प आहे. प्रत्येक टनास ३६६१ रुपये टीपिंग दर ठेकेदाराला देण्यात येणार आहे. दर दिवशी १३ लाख ७२ हजार ८७५ रुपये दिले जाणार आहेत. वर्षाला तब्बल ५० कोटी १० रुपये द्यावे लागणार आहेत. १५ वर्षांसाठी ही रक्कम ७५० कोटींवर जाते. दररोज नऊ हजार किलो सीएनजी निर्माण झाल्यास दिवसाला ६ लाख ३० हजार रुपये ठेकेदाराला मिळणार आहेत. प्रकल्पासाठी महापालिका व शासन एकूण ८४ कोटी रुपये अनुदान देणार आहे. ठेकेदाराचा केवळ दीडशे कोटी रुपये खर्च होणार आहे. मोठ्या प्रमाणात ठेकेदारास नफा मिळणार आहे. पर्यावरण अभियांत्रिकी विभागाचे निलंबित मुख्य अभियंता संजय कुलकर्णी तसेच, सल्लागार टंडन यांनी प्रकल्पाची निविदा राबवली आहे.

---

# दूध भेसळ प्रकरणावरून लक्ष विचलित करण्यासाठी निकम यांची बदनामी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर : विशेष प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीनंतर माजी सभापती देवदत्त निकम यांनी नागापूर येथे साडेपाच एकर शेतजमीन खरेदी केल्याच्या आरोपांवर नागापूरचे माजी सरपंच गणेश यादव यांनी पत्रकार परिषद घेऊन स्पष्टीकरण दिले. दूध भेसळ प्रकरणात देवदत्त निकम यांनी प्रभावीपणे आवाज उठविल्यामुळे जनतेचे लक्ष त्या मुद्द्यावरून विचलित करण्यासाठी विरोधकांकडून त्यांची वैयक्तिक बदनामी केली जात असल्याचा आरोप यादव यांनी केला.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर बांगर यांनी विधानसभा निवडणुकीनंतर देवदत्त निकम यांनी साडेपाच एकर शेतजमीन खरेदी केल्याबाबत प्रश्न उपस्थित करत या व्यवहाराची माहिती आयकर विभागाकडे देणार असल्याचे जाहीर केले होते. या आरोपांना उत्तर देताना यादव म्हणाले की, निकम यांनी विविध ठिकाणची स्वतःची १३ एकर शेतजमीन विकून त्याच पैशातून नागापूर येथे साडेपाच एकर जमीन खरेदी केली आहे. ''त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात पैसा असता, तर त्यांनी आधीची जमीन विकलीच नसती,'' असा सवालही त्यांनी उपस्थित केला. निकम यांच्या शेतीतील उत्पन्नाची नोंद आयकर विवरणपत्रात असून, ही कमाई शेती व्यवसायातून झाल्याचा दावा यादव यांनी केला. ''निकम यांच्याकडे सोन्याची द्राक्षे नसली, तरी त्यांच्या द्राक्षाला सोन्याचा भाव मिळाला,'' असे सूचक वक्तव्यही त्यांनी केले. यादव यांनी प्रभाकर बांगर यांच्यावरही प्रत्यारोप करत, २०२४मध्ये निकम यांच्या खात्यातून त्यांना २० हजार रुपये देण्यात आल्याचा उल्लेख केला. तसेच विधानसभा निवडणुकीदरम्यान तालुका अध्यक्षांकडून पैसे घेतल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला. बांगर यांच्यावर हल्ला झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मदतीला धाव घेतल्याचे सांगत त्यांनी ''सुपारीबहाद्दर'' असा उल्लेखही केला. यावेळी युवक अध्यक्ष विशाल वाबळे यांनीही देवदत्त निकम हे सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठवत असून, दूध भेसळविरोधातील त्यांचा लढा यशस्वी होईल, असा

---

# तंत्रज्ञानाच्या युगात आरोग्याविषयी जागरूकता काळाची गरज : अमृता फडणवीस

## 'पाठ फिरवा पाठदुखीकडे' पुस्तकाच्या मराठी व इंग्रजी आवृत्तीचे प्रकाशन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे । प्रतिनिधी**

डिजिटल उपकरणांचा वाढता वापर, दीर्घकाळ एकाच जागी बसून काम करण्याची सवय, चुकीची बैठक आणि शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे पाठीचे व मानदुखीचे विकार झपाट्याने वाढत आहेत. त्यामुळे आजच्या तंत्रज्ञानकेंद्रित युगात उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि आरोग्याविषयी जागरूकता अधिक महत्त्वाची ठरली आहे, असे प्रतिपादन दिविजा फाऊंडेशनच्या संस्थापिका अमृता फडणवीस यांनी केले.

मणक्याच्या आजारांवरील तज्ज्ञ डॉ. अजय कोठारी आणि डॉ. अभिनव भुते लिखित 'पाठ फिरवा पाठदुखीकडे' या पुस्तकाच्या मराठी व इंग्रजी आवृत्तीच्या प्रकाशन सोहळ्यात त्या बोलत होत्या.

यावेळी संचेती रुग्णालयाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. पराग संचेती, उद्योजक सौरभ बोरा, मृणाल पवार, लेखक डॉ. अजय कोठारी, डॉ. अभिनव भुते, रमेश कोठारी तसेच वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

अमृता फडणवीस म्हणाल्या, उपचारांपेक्षा प्रतिबंध अधिक प्रभावी ठरतो आणि त्याची सुरुवात जागरूकतेपासून होते. निरोगी व सक्रिय जीवनासाठी शरीर समजून घेणे आणि आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारणे आवश्यक



आहे. मणक्याच्या आरोग्याबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी हे पुस्तक महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मृणाल पवार म्हणाल्या, आजची पिढी तंत्रज्ञानाशी अधिक जोडली गेली असली तरी स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत आहे. मणक्याचे आरोग्य ही केवळ वेदनांवरील उपचारांची बाब नसून, संतुलित जीवनशैली आणि जीवनमान सुधारण्याशी संबंधित आहे. या पुस्तकातून दोन अनुभवी डॉक्टरांचे दोन दशकांचे वैद्यकीय ज्ञान सर्वसामान्यांसाठी सोप्या भाषेत उपलब्ध झाले आहे.

डॉ. अजय कोठारी यांनी सांगितले की, मानदुखी व पाठदुखी आता केवळ ज्येष्ठांपुरती मर्यादित राहिलेली नाही. स्क्रीनचा वाढता वापर, व्यायामाचा अभाव, चुकीच्या पद्धतीने बसणे आणि अयोग्य जीवनशैलीमुळे तरुणांमध्येही या समस्या वेगाने वाढत आहेत. आजार गंभीर होण्यापूर्वीच लोकांनी त्याबाबत जागरूक होऊन प्रतिबंधात्मक उपाय अवलंबावेत, या उद्देशाने हे पुस्तक लिहिण्यात आले आहे. मुख्य भाषणात डॉ. पराग संचेती यांनी आधुनिक जीवनशैलीमुळे शारीरिक हालचाली कमी झाल्याची खंत व्यक्त केली. सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता वेळेवर निदान व उपचार करणे गरजेचे असल्याचे सांगत त्यांनी नियमित व्यायाम, शरीराचे योग्य वजन, पुरेशी विश्रांती, मानसिक शांतता आणि शिस्तबद्ध जीवनशैली या निरोगी आयुष्याच्या पाच मूलभूत सूत्रांचा पुनरुच्चार केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भूषण करंदीकर यांनी केले, तर डॉ. डिंपल कोठारी यांनी आभार मानले.

## सारांश वृत्त

### आसारामला सर्वोच्च न्यायालयाचा दणका! वैद्यकीय कारणावरही अंतरिम जामीन नाकारला; तुरुंगातच २४ तास वैद्यकीय मदतीची परवानगी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली: प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या स्वयंघोषित धर्मगुरू आसाराम याला सर्वोच्च न्यायालयाने वैद्यकीय कारणास्तव अंतरिम जामीन देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. मात्र, त्याच्या आरोग्याची गरज लक्षात घेऊन तुरुंगातच त्याच्या पसंतीचा प्रशिक्षित परिचारक २४ तास वैद्यकीय मदत देऊ शकेल, अशी परवानगी न्यायालयाने दिली. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, जर भविष्यात आसारामची प्रकृती गंभीररीत्या खालावली, तर त्याला पुन्हा अंतरिम दिलासासाठी न्यायालयात अर्ज करण्याचे स्वातंत्र्य असेल. मात्र, सध्याच्या परिस्थितीत जामीन मंजूर करण्यास न्यायालयाने नकार दिला. यापूर्वी २७ मे २०२६ रोजी राजस्थान उच्च न्यायालयाने २०१३ मध्ये जोधपूर येथील आश्रमात अल्पवयीन भक्तेवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आसारामला सुनावलेली जन्मठेपेची शिक्षा कायम ठेवली होती. उच्च न्यायालयाने दोषसिद्धीवर शिक्कामोर्तब करत त्याचे अपील फेटाळले होते. गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर स्पष्ट झाले की, आरोग्यविषयक कारणे मांडली असली तरी गंभीर गुन्ह्यांमध्ये दोषी ठरलेल्या कैद्याला जामीन देताना न्यायालय अत्यंत सावध भूमिका घेत आहे. त्याचवेळी मानवी दृष्टिकोनातून आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचा मार्गही न्यायालयाने खुला ठेवला आहे. या निर्णयामुळे आसारामला सध्या तुरुंगातच राहावे लागणार असून, त्याच्या आरोग्याशी संबंधित पुढील घडामोडींवरच भविष्यातील कोणताही अंतरिम दिलासा अवलंबून असेल.

# अमेरिकेच्या शुल्कांच्या फटक्याने भारतीय उद्योग संकटात!

## संसदीय समितीचा केंद्राला इशारा; व्यापार करार लवकर करा, निर्यातदारांना दिलासा द्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अमेरिकेने लादलेल्या वाढीव आयात शुल्कांचा फटका भारतीय निर्यातदारांना बसत असताना, संसदेच्या एका महत्त्वाच्या समितीने केंद्र सरकारला अमेरिकेसोबतचा द्विपक्षीय व्यापार करार तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. संसदेत सादर करण्यात आलेल्या अहवालात समितीने स्पष्ट इशारा दिला आहे की, जागतिक स्पर्धेत भारतीय उद्योग मागे पडू नयेत यासाठी स्थिर आणि विश्वासार्ह बाजारपेठेची हमी मिळवणे अत्यावश्यक आहे.

समितीच्या मते, अमेरिकेच्या शुल्क धोरणामुळे विशेषतः रत्ने व दागिने, वस्त्रोद्योग, सागरी उत्पादने आणि चर्मोद्योग यांसारख्या मोठ्या प्रमाणावर रोजगार देणाऱ्या क्षेत्रांना मोठा फटका बसला आहे. त्यामुळे भारताने अमेरिका, स्वित्झर्लंड, कॅनडा आणि मेक्सिकोसारख्या प्रतिस्पर्धी देशांच्या तुलनेत समान शुल्क सवलती मिळवण्यासाठी आक्रमक




भूमिका घ्यावी, अशी शिफारस करण्यात आली आहे.

अहवालानुसार प्रस्तावित व्यापार करारामध्ये जनरिक औषधे, महत्त्वाची खनिजे, भ्रमणध्वनी उपकरणे, अभियांत्रिकी उत्पादने, वाहन सुटे भाग, रसायने, वस्त्रोद्योग, सागरी उत्पादने, चर्मोद्योग, रत्ने आणि दागिने या क्षेत्रांचा समावेश असावा. ही क्षेत्रे भारतीय निर्यातीचा कणा मानली जातात.

दरम्यान, भारत आणि अमेरिका या दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांनी व्यापार करारावरील चर्चा अंतिम टप्प्यात असल्याचे संकेत दिले आहेत. अमेरिकन अधिकाऱ्यांच्या मते, पुढील तीन ते चार महिन्यांत करारावर स्वाक्षऱ्या होण्याची शक्यता आहे.

मात्र, प्रश्न असा आहे की, व्यापार कराराच्या चर्चेला वर्षानुवर्षे लागतात; पण शुल्क वाढीचा फटका उद्योगांना तात्काळ बसतो. त्यामुळे निर्यातदारांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने केवळ चर्चांवर अवलंबून न राहता तातडीची संरक्षणात्मक पावले उचलण्याची गरज असल्याचे मत उद्योग क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

भारतीय उद्योगांना जागतिक स्पर्धेत टिकवून ठेवण्यासाठी आणि लाखो रोजगारांचे संरक्षण करण्यासाठी हा व्यापार करार आता केवळ आर्थिक नव्हे, तर धोरणात्मकदृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

## भारताची सामरिक ताकद आणखी भक्कम! 'अग्नी-४' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी; स्वदेशी संरक्षण क्षमतेला नवे बळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भुवनेश्वर । प्रतिनिधी**

भारताने आपल्या सामरिक संरक्षण क्षमतेत आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठत 'अग्नी-४' या स्वदेशी मध्यम पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची गुरुवारी ओडिशातील चांदीपूर येथील एकात्मिक चाचणी केंद्रातून यशस्वी चाचणी केली.

ही चाचणी स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांड (एसएफसी) यांच्या देखरेखीखाली पार पडली.

संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, या चाचणीदरम्यान क्षेपणास्त्राच्या सर्व महत्त्वाच्या तांत्रिक आणि कार्यात्मक प्रणाली अपेक्षेनुसार यशस्वीपणे कार्यरत असल्याची पुष्टी झाली. या यशस्वी प्रक्षेपणामुळे 'अग्नी-४'ची प्रत्यक्ष कार्यक्षम सज्जता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे.

'अग्नी-४' हे पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानावर विकसित करण्यात आलेले मध्यम पल्ल्याचे बॅलिस्टिक क्षेपणास्त्र असून, भारतीय सामरिक प्रतिरोधक क्षमतेचा तो महत्त्वाचा भाग मानला जातो. या यशस्वी चाचणीमुळे देशाच्या संरक्षण व्यवस्थेला अधिक बळ मिळाले असून, स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञान विकसित करण्याच्या भारताच्या क्षमतेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेच्या दिशेने भारत सातत्याने वाटचाल करत असून, अशा यशस्वी चाचण्या देशाच्या सामरिक सुरक्षिततेसह जागतिक स्तरावरील संरक्षण क्षमतेलाही अधिक मजबूत बनवत आहेत.

## अतीक अहमदचा धाकटा मुलगा भीषण अपघातात ठार; झाशी कारागृहाकडे जाताना राष्ट्रीय महामार्गावर दुर्घटना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**झाशी । प्रतिनिधी**

कुख्यात गुंडातून राजकारणी बनलेला अतीक अहमद याचा धाकटा मुलगा अबान अहमद गुरुवारी सकाळी उत्तर प्रदेशातील झाशी–कानपूर राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या भीषण रस्ता अपघातात ठार झाला. पोलिसांनी या घटनेला दुजोरा दिला आहे.



पोलिसांच्या माहितीनुसार, अबान अहमद ज्या कारमधून प्रवास करत होता, त्या वाहनावरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार थेट महामार्गावरील दुभाजकावर आदळली. हा अपघात झाशी जिल्ह्यातील पूंछ पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला. प्राथमिक माहितीनुसार, अबान अहमद आपल्या मोठ्या भावाला भेटण्यासाठी झाशी कारागृहाकडे जात होता. अपघातानंतर त्याला तातडीने मदत करण्यात आली; मात्र त्याचा मृत्यू झाला. दरम्यान, अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, वाहनावरील नियंत्रण कशामुळे सुटले याचा तपास सुरू आहे. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून वाहन ताब्यात घेतले असून पुढील चौकशी सुरू आहे.

गुंडगिरी, खंडणी आणि अनेक गुन्हेगारी प्रकरणांमुळे देशभर चर्चेत राहिलेला अतीक अहमद आणि त्याचा भाऊ अश्रफ अहमद यांची एप्रिल २०२३ मध्ये प्रयागराज येथे गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. त्यानंतर त्यांच्या कुटुंबाशी संबंधित प्रत्येक घडामोडीवर लक्ष राहिले आहे.

# लखीमपूर खेरी हिंसाचार प्रकरण: आशिष मिश्रांच्या जामिनात आणखी सवलत देण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

२०२१ मधील गाजलेल्या लखीमपूर खेरी हिंसाचार प्रकरणातील मुख्य आरोपी आशिष मिश्र यांना सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. गुरुवारी सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहन यांच्या खंडपीठाने त्यांच्या जामिनाच्या अटींमध्ये आणखी शिथिलता देण्यास स्पष्ट नकार दिला.

आशिष मिश्र यांनी आपल्या मूळ गावी जाऊन कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याची परवानगी मागितली होती. त्यांच्या वकिलांनी न्यायालयात सांगितले की, विद्यमान जामीन अटींमुळे त्यांना स्वतःच्या मुलीच्या वाढदिवसासारख्या कौटुंबिक कार्यक्रमांनाही उपस्थित राहता येत



नाही. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने हा युक्तिवाद स्वीकारण्यास नकार देत त्यांचा अर्ज फेटाळून लावला.

लखीमपूर खेरी हिंसाचार प्रकरण हे देशातील सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या प्रकरणांपैकी एक आहे. या प्रकरणात सुरू असलेल्या न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीही जामिनाच्या अटींवर कठोर भूमिका घेतली होती. गुरुवारच्या निर्णयातूनही न्यायालयाने त्याच भूमिकेचा पुनरुच्चार केला.

या निर्णयामुळे स्पष्ट संकेत मिळाले आहेत की, गंभीर फौजदारी प्रकरणांतील आरोपींना केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक कारणांवर जामिनाच्या अटी शिथिल केल्या जाणार नाहीत, विशेषतः जेव्हा खटला अद्याप न्यायप्रविष्ट आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे आशिष मिश्र यांना पूर्वीप्रमाणेच विद्यमान जामीन अटींचे पालन करावे लागणार असून, लखीमपूर खेरी हिंसाचार प्रकरणातील पुढील न्यायालयीन सुनावण्यांकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सीमेवर जवान, पण वेतनासाठी प्रतीक्षा? कॅगच्या अहवालाने संरक्षण मंत्रालयावर गंभीर प्रश्न;

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या जवानांच्या वेतन आणि भत्त्यांच्या व्यवस्थापनावर भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग) यांच्या अहवालाने गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ६ ऑगस्ट २०२६ रोजी संसदेच्या लोकलेखा समिती (झअउ) ने संरक्षण मंत्रालयातील अधिकाऱ्यांची कडक चौकशी केली. काँग्रेसचे वरिष्ठ नेते के. सी. वेणुगोपाल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कॅगच्या निष्कर्षांवर मंत्रालयाकडून स्पष्टीकरण मागवण्यात आले.

कॅगने २०२०–२१ ते २०२२–२३ या कालावधीत ४६ वेतन व लेखा कार्यालये आणि प्रिन्सिपल कंट्रोलर ऑफ डिफेन्स अकाउंट्स (ऑफिसर्स) यांच्या कामकाजाचे परीक्षण केले. या काळात ३,०९,९७५.०७ कोटींच्या वेतन आणि भत्त्यांचे व्यवस्थापन करण्यात आले. मात्र, तपासणीत अनेक गंभीर त्रुटी समोर आल्या.

अहवालानुसार, जवानांचे वेतन मंजूर होण्यासाठी सरासरी ६८ ते ८० दिवसांचा विलंब होत होता. याशिवाय ६ लाखांहून अधिक वेतन आदेश कोणतेही कारण नोंदविल्याशिवाय हाताने फेटाळण्यात आले. परिणामी ५०,६४६ जवानांना जोखीम आणि कठीण परिस्थिती भत्ता मिळालाच नाही, कारण फेटाळलेले आदेश पुन्हा तपासलेच गेले नाहीत.

विशेष मोहिमेद्वे १३.४८ लाख प्रलंबित आदेश निकाली काढल्याचा दावा करण्यात आला असला, तरी अजूनही ५.९४ लाख आदेश प्रलंबित असल्याचे कॅगने नमूद केले आहे. याच अहवालात परवान्याशिवाय क्ष–किरण यंत्रांचा वापर आणि नियमित तांत्रिक तपासण्या वर्षानुवर्षे न झाल्याने लष्करी रुग्णालयातील एका इमारतीचा भाग कोसळल्याचाही उल्लेख आहे.

हे निष्कर्ष संरक्षण व्यवस्थेतील प्रशासकीय कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित करतात. मात्र, या त्रुटी जाणूनबुजून झाल्या किंवा सरकारच्या हेतूमुळे झाल्या, असा कोणताही निष्कर्ष कॅग किंवा लोकलेखा समितीने काढलेला नाही. सध्या समितीने संरक्षण मंत्रालयाकडून स्पष्टीकरण मागवले असून, पुढील कार्यवाही अहवाल आणि मंत्रालयाच्या उत्तरांवर अवलंबून असेल.

## हवाई प्रवासात मोठा बदल..! पुणे विमानतळावरून लवकरच वाढणार नवीन फ्लाइट्सची संख्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : प्रतिनिधी**

भारतीय हवाई दलाच्या सहकार्यामुळे पुणे विमानतळावर उपलब्ध झालेल्या अतिरिक्त स्लॉटचा पूर्ण क्षमतेने वापर होणार आहे. त्यामुळे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमानसेवा विस्तारण्यास प्राधान्य देण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय नागरी हवाई वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली. पुणेकरांना अधिक शहरांशी थेट हवाई संपर्क उपलब्ध व्हावा, तसेच वाढत्या प्रवासी मागणीची प्रभावी पूर्तता व्हावी, यासाठी केंद्र सरकार सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मोहोळ म्हणाले, 'पुणे विमानतळावरून सध्या इंडिगो, एअर इंडिया, एअर इंडिया एक्स्प्रेस, अकासा एअर, स्पाइसजेट, फ्लाय९१, स्टार एअर आणि अलायन्स एअर या विमान कंपन्यांकडून सेवा दिली जात आहे. वाढीव स्लॉट उपलब्ध झाल्यानंतर विमान कंपन्यांच्या मुख्यालयांशी समन्वय साधून पुण्यातून नवीन शहरांसाठी उड्डाणे सुरू करणे तसेच विद्यमान मार्गांवरील उड्डाणांची संख्या वाढविण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे.'

आयटी, उद्योग, शिक्षण, संरक्षण आणि पर्यटन क्षेत्रामुळे हवाई प्रवासाची मागणी सातत्याने वाढत आहे. त्यामुळे पुणे विमानतळाची क्षमता अधिक प्रभावीपणे वापरणे, नवीन उड्डाणांना चालना देणे आणि प्रवाशांना अधिक पर्याय उपलब्ध करून देणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. भविष्यातही पुण्याची हवाई जोडणी अधिक मजबूत करण्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला जाईल, असे मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले.

# आधी खोदकाम मग पर्यावरणीय परवानग्या? 'गुगलच्या सुमारे १.२५ लाख कोटींच्या माहिती-संग्रह केंद्र प्रकल्पावरून सरकारच्या 'आधी काम, नंतर कायदा' पद्धतीवर पुन्हा प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

जगातील आघाडीची तंत्रज्ञान कंपनी गुगल आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे सुमारे १५ अब्ज अमेरिकी डॉलर (अंदाजे १.२५ लाख कोटी) खर्चाचा माहिती-संग्रह केंद्र (डेटा सेंटर) प्रकल्प उभारत आहे. राज्य सरकार या प्रकल्पाला ऐतिहासिक आणि राज्याच्या विकासासाठी मैलाचा दगड ठरवणारा प्रकल्प म्हणत असले, तरी पर्यावरणप्रेमी, स्थानिक नागरिक आणि सामाजिक संघटनांनी गंभीर आक्षेप नोंदवले आहेत. त्यांचा आरोप आहे की, डोंगर उत्खनन, जंगल परिसरातील हस्तक्षेप आणि पाणीस्रोतांवरील संभाव्य परिणामांचा सखोल अभ्यास पूर्ण होण्यापूर्वीच प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली. राज्य सरकारने हे सर्व आरोप फेटाळले असून, सर्व प्रक्रिया कायद्याच्या चौकटीत पार पडत असल्याचा दावा केला आहे. गुगलनेही भारतीय नियमांचे पालन करूनच प्रकल्प उभारला जात असल्याचे स्पष्ट केले आहे.

मात्र, प्रश्न केवळ एका माहिती-संग्रह केंद्राचा नाही. प्रश्न असा आहे की, मोठ्या प्रकल्पांमध्ये पर्यावरणीय नियम, कायदेशीर परवानग्या आणि सार्वजनिक आक्षेप यांना खरोखरच प्राधान्य दिले जाते का, की आधी काम सुरू करून नंतर न्यायालयात स्पष्टीकरण देण्याचीच पद्धत रूढ झाली आहे?

याच मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रकरणांमध्ये स्पष्ट भूमिका घेतली आहे. न्यायालयाने शाश्वत विकास, पूर्वसावधगिरीचे तत्त्व आणि सार्वजनिक विश्वस्त तत्त्व यांचा वारंवार उल्लेख करत विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हे सरकारचे घटनात्मक कर्तव्य असल्याचे स्पष्ट केले आहे. पर्यावरणीय मंजुरी ही केवळ कागदोपत्री प्रक्रिया नसून ती वैज्ञानिक अभ्यास, लोकसहभाग आणि कायदेशीर परीक्षणावर आधारित असली पाहिजे, असे सर्वोच्च न्यायालयाने अनेक निर्णयांत नमूद केले आहे.

पर्यावरणप्रेमींचा दावा आहे की, विशाखापट्टणममधील हा प्रकल्प मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर करणार असून त्यामुळे स्थानिक जलस्रोतांवर तसेच वन्यजीवांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत पर्यावरणीय परिणामांचा सखोल अभ्यास आणि जनसुनावणी पूर्ण होण्यापूर्वीच काम सुरू झाल्याचा आरोप अधिक गंभीर ठरतो. दुसरीकडे, आंध्र प्रदेश सरकार हे सर्व आरोप फेटाळत न्यायालयात आपली भूमिका ठामपणे मांडणार असल्याचे सांगत आहे.

देशात ही परिस्थिती नवी नाही. द्रुतगती मार्ग, बंदरे, औद्योगिक पट्टे, खाण प्रकल्प, माहिती-संग्रह केंद्रे किंवा इतर मोठे उद्योग असोत, अनेक वेळा आधी काम सुरू करा आणि नंतर परवानग्या पूर्ण करा अशी टीका होत आली आहे. त्यामुळे नागरिकांच्या मनात एकच प्रश्न निर्माण होतो जर पर्यावरणीय नियम आणि कायदेशीर प्रक्रिया इतक्या महत्त्वाच्या असतील, तर अनेक प्रकल्पांमध्ये प्रत्यक्ष काम आधी आणि न्यायालयीन वाद नंतरच का सुरू होतात?

या प्रकरणात अंतिम सत्य न्यायालयीन प्रक्रियेनंतरच स्पष्ट होईल. मात्र, या वादामुळे पुन्हा एकदा विकासाच्या नावाखाली पर्यावरणीय नियमांकडे दुर्लक्ष होत आहे का, हा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

देशाला गुंतवणूक, रोजगार आणि डिजिटल पायाभूत सुविधा निश्चितच आवश्यक आहेत; पण त्या घटना, पर्यावरणीय कायदे आणि सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या तत्त्वांचे पालन करूनच उभारल्या गेल्या पाहिजेत. अन्यथा आधी प्रकल्प आणि नंतर परवानग्या हीच देशातील विकासाची नवी कार्यपद्धती ठरण्याचा धोका निर्माण होईल.